पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD,
PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र.३०६२ दि. २१/०९/२०१९**

## अलंकार पोलीस स्टेशन

## घरगुती गॅस सिलेंडर स्फोट झालेल्या ठिकाणी तात्काळ मदत

दिनांक २०/०९/२०१९ रोजी रात्रौ २३.१५ वा चे दरम्यान अलंकार पो.स्टे हददीतील रात्रपाळी कर्तव्यावरील डहाणुकर मार्शल यांना पुणे पुणे नियंत्रण कक्ष येथुन अलंकार पो.स्टे हददीतील प्रियदर्शनी सोसायटी, फलॅट नंबर २ लेन ६ डहाणुकर कॉलनी पुणे येथुन धुर येत आहे तसेच मोठा आवाज झाले बाबतचा कॉल प्राप्त झाला होता सदर कॉल प्राप्त होताच डहाणुकर मार्शल कर्मचारी, रात्रपाळी अधिकारी सपोनिरी माळी, चौकी अंमलदार पोहवा कडोलकर तात्ळाक घटनास्थळी हजर झाले. सदर ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरचा स्फोट झालेला होता त्यामुळे तेथे मोठया प्रमाणात बघ्यांची गर्दी जमलेली होती त्यामुळे मदतकार्यात अडथळा तसेच वाहतुकीस आडथळा होत होता त्यामुळे फायरब्रिगेड त्यांना काम करणे अवघड झालेले होते. त्यावेळी अधिकारी व कर्मचारी यांनी लोकांची पांगापांग करुन वाहतुक सुरळीत करुन सदर ठिकाणी भाजलेले इसम नामे केदार चारुदत्त कुबेर व अनखी एक इसम त्यांना लागलीच उपचारकामी शाश्वत हॉस्पिटल येथे ॲम्ब्युलन्स बोलावुन पाठविण्यात आले तसेच सदर आग लागलेल्या फलॅट मधील महत्याचे सामान बाहेर काढुन पुढील योग्य ती मदत केलेली आहे. सदर कामगिरी सपोनिरी माळी, पोहवा २१३८ कडोलकर, पोशि ८३७२ खरात, पोशि ८८१७ सुतार यांनी केलेली आहे.